# महात्मा फुलेंचे शैक्षणिक योगदान - एक अभ्यास

**प्रा. डॉ. महादेव गणपत देशमुख**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
यशवंतराव चव्हाण, महाविद्यालय,
तुळजापूर, जि. उस्माणाबाद.
Mb. 9011471966
mahadevdeshmukh007@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतातील शिक्षणक्षेत्राच्या विकासाचा व पर्यायाने त्यातील महाराष्ट्राच्या योगदानाचा जेव्हा विचार होतो तेव्हा महात्मा फुले यांचे नाव घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही. सर्व समाज परंपरा व रुढिंच्या जोखडाखाली वावरत असतांना शिक्षणाचा विचार करुन त्यातून समाजक्रांती घडविण्याचा दृष्टिकोन बाळगणारे महात्मा फुले हे शिक्षणक्षेत्रासाठी आदर्शच आहेत. कारण समाजात शुद्रातिशुद्रांना व स्त्रीयांना शिक्षणाचा हक्क नाकारल्या जात असताना याच शुद्रांना, विशेषत: स्त्रियांना शिकवण्याची भाषा करुन त्याव्दारे समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे व ते सत्यात उतरविण्यासाठी अखंड प्रयत्न करण्याचे फुलेंचे कार्य दखल घेण्यासारखे आहे, म्हणूनच त्यांना महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे अग्रदुत म्हटले जाते.

फुलेना समाजातील शुद्रातिशुद्रांबद्दल उदंड आणि अखंड सहानुभुती होती. ती सहानुभूती विशिष्ट जात, प्रदेश, धर्म यांनी मर्यादित नव्हती, तर ती ख-या अर्थाने शुद्ध माणुसकिची होती, कोणत्याही वृथा अभिमानापासून आणि विषमतेच्या विषापासुन ती संपुर्णपणे अलिप्त होती. वरिष्ठ वर्गाकडुन ज्यांच्यावर अल्याय होत असे त्या वर्गाबद्दल फुलेंना नेहमीच कळवळा होता.

समाजाच्याा शुद्रातिशुद्रांवर आणि स्त्रीयांवर हजारो वर्षे सतत होत असलेल्या भयानक अन्यायाबद्दल ते अन्याय चालु ठेवणा-या जन्मजात विषमतेबद्दल, ती विषमता निर्माण करणा-या आणि टिकविणा-या समाजरचनेबद्दल व त्या समाजाच्या वरिष्ठ वर्गीय मक्तेदार नेत्यांबद्दल फूल्यांच्या मनात विलक्षण संताप आणि चीड उत्पन्न झाली होती. स्त्री- शुद्रातिशुद्रांबद्दल अथांग कळवळा आणि त्यांच्या वरिल अन्यायाला जबाबदार असणा-या वरिष्ठ समाज नेत्यांबद्दलची चीड ही फुल्यांची खरी प्रेरणा, प्रेरकशक्ती होती.

महात्मा फुले यांनी ज्या समाजपरिवर्तनाची अपेक्षा केली होती त्याचे मुळ शिक्षणात आहे. याची त्यांना जाणीव होती. शिक्षणामुळे सामाजिक समता प्रस्थापित करता येईल, शुद्रांच्या मनातील अंधश्रध्दा दुर होतील, धर्माच्या नावाखाली वरिष्ठ वर्गाकडून आपली पिळवणूक होत आली आहे, याची शुद्रांना जाणीव होईल. हे सर्व शिक्षणामुळे साध्य करता येईल, असे फुलेंची धारणा होती आणि त्यामुळेच फुलेंनी शुद्रातिशुद्र आणि स्त्री शिक्षणासाठीचे कठिण कार्य हाती घेतले व ते सिध्दीस नेले. प्रस्तुत शोधनिबंधात फुलेंनी शुद्रातिशुद्र व स्त्रीशिक्षणासाठी केलेल्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेतला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. महात्मा फुलेंच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.
२. महात्मा फुलें यांच्या स्त्री शिक्षण विषयक कार्याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :**

१. महात्मा फुलें यांनी शुद्रातिशुद्रांसाठी शिक्षणाचे क्षेत्र खुले केले आहे.

२. महात्मा फुलें यांनी स्त्रीयांच्या शिक्षणासाठी महत्वपूर्ण कार्य केले आहे.

**शुद्रातिशुद्रांच्या शिक्षणासाठी कार्य :**

महित्मा फुलेंना समाजातील जातीवर आधारलेली विषमता आणि या विषमतेमधून वरिष्ठ वर्गाकडून कनिष्ठ वर्गाची होणारी पिळवणूक याचा तीव्र राग येत असे. समाजातील शुद्रातिशुद्रांची स्थिती सुधारायची असेल तर त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे असे फुलेंच्या लक्षात आले.

शिक्षणाने गुलामगिरीचे कोट उध्वस्त होऊ शकतात असे फुल्यांनी घोषित करताच वर्णवर्चस्वाच्या लढाईला जास्तीचे तोंड फुटले. धर्माच्या नावाखाली लादलेली ही गुलामगिरी सकळ मानवजातीसाठी अहितकारक असल्याचे मत फुलेंनी मांडले.[१]

फुलेंच्या काळातील शुद्रातिशुदांना कोणत्या अडचणींमधुन जीवन जगावे लागत याची आपण कल्पना ही करु शकत नाही, तर त्या काळातील उच्चवर्णीय समाजाला शुद्रांची स्थिती कधीच कळाली नाही आणि त्याबाबत या उच्चवर्गाला खंतही नव्हती. फुलेंना हे उमगले होते की, तळागाळातील जनतेला वर उचलायचे असेल तर शिक्षण हा एकमेव उपाय आहे. मनुष्यजीवनात दु:ख, दारिद्रय निर्माण होण्याचे कारण विद्याहिनता होय. गुलामगिरीच्या पाशात फसतो तेही विद्याहिनतेमुळेच. शिक्षणाचा अभाव हे जीवनाचे नुकसान होण्यास कारण ठरते, त्यामुळे फुलेंनी शिक्षणक्षेत्रामध्ये आपले कार्य आरंभले.[२]

अज्ञान म्हणजे अंधकार व ज्ञान म्हणजे प्रकाश,हा प्रकाश अज्ञानाचा अंधकार नष्ट करुन मनुष्याचे जीवन चैतन्यमय व आनंदमय करुन सोडतो. जीवनाचा संपुर्ण कायापालट करण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. मानवी हक्क आणि कर्तव्य याची जाणीव करुन देण्याचे माध्यम शिक्षण आहे. समाज परिवर्तनाची व समाज सामर्थ्याची बीजे शिक्षणात सामावलेली आहेत. शिक्षण हे सर्व सुधारणेचे मुळ आहे, हे जोतीरावांनी ओळखले होते.[३] जोतीरावांनी त्यांच्या काळातील सामाजिक स्थिती सांगताना म्हटले की, म्हार, मांग, चांभार हे या देशात फार असुन ते नीचावस्थित आहेत. हे पाहुन ईश्वराच्या प्रेरणेने माझ्या मनात अशी इच्छा उत्पन्न झाली की अशास सुशिक्षित करण्यासाठी काहीतरी उपाय योजावा.[४] या वाक्यातुन त्या काळातील शुद्रांची स्थिती आणि त्यात बदल व्हावा अशी तीव्र इच्छा बाळगुन कार्य सुरु करणा-या फुल्यांचे कार्य स्पष्ट होते.जोतीरावांच्या मतानुसार कनिष्ठ वर्गातील लोकांसाठी अशा शिक्षणाची आवश्यकता होती की जेणेकरुन ते आपल्या सामाजिक समतेच्या व व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्कासाठी झगडण्यास तयार होतील.[५]

१८४८ साली जोतीरावांनी अस्पृश्य मुलामुलींसाठी पुण्यातील अहिल्याश्रमात शाळा सुरु केली. महारमांगांना शिक्षण देण्याची कल्पनाच केवढी धर्मद्रोहीं। सोवळ्याओवळ्याचे एवढे बंड माजलेले । तेथे जोतीरावांनी विद्येचा दरवाजा या वर्गाला खुला केला. ते मांगवाड्यात, महारवाड्यात हिंडले, वर्णजातीव्यवस्थेने या वर्गाची मनेही गुलाम बनलेली. त्यांनाही शिकणे म्हणजे पाप वाटे. विद्यार्थी मिळविणे कठिण जाई. जोतीरावांनी केवळ शाळा सुरु केल्या नाहीत तर त्यासाठी अभ्यासकम तयार केला. शिक्षणाच्याव्दारे समाजपरिवर्तनाचे चित्र ते रंगवत होते.[६] महात्मा फुलेंना शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचा जनक असे संबोधले जाते. शिक्षणासाठी जात, धर्म, पंथ, लिंग व शारीरिक अपंगता असा अडसर न ठेवता समाजातील सर्वच घटकांना समानतेच्या तत्वावर शिक्षणाची संधी उपलब्ध असावी तरच समाजात सर्वांना समान न्याय मिळेल अशी फुलेंची भुमिका होती.[७] शुद्रातिशुद्रांना असे शिक्षण दिले जावे. की जे घेतल्यावर सामाजिक समतेच्या लढ्यात त्यांनी अग्रेसर व्हावे. व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क त्यांनी संघर्षपर्वक पदरात पाडुन घ्यावा आणि परिवर्तन प्रक्रियेचे नेतृत्व करावे इत्यादी. शिक्षणाची ध्येये असावित असे फुलेंचे स्पष्ट मत होते. फुलेंच्याच सहका-यांपैकी पुष्कळांचे मत असे होते की, कनिष्ठ वर्गांना फक्त लिहणे वाचणे व

आकडेमोड करायला शिकवावे, तर जोतीरावांना मात्र शिक्षणाव्दारे त्या वर्गाची विचारशक्ती जागृत व्हावी, हक्कांचे भान यावे आणि हिताहिताचा व सत्यासत्याचा विवेकल्यांना करता यावा असे फलित अपेक्षित होते.[८]

**तृतीयरत्न नाटक :**

तृतीयरत्न हे नाटक १८५५ साली महात्मा फुलेंनी लिहीले. या नाटकांत सामाजिक, धार्मिक आशयाबरोबर शैक्षणिक विचारही मांडले हे नाटक मुळात बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून देण्याच्या उद्देशाने लिहीलेले होते. शिक्षण हा मानसाचा तिसरा डोळा आहे हा संदेश त्यांनी या नाटकांतुन दिला.[९] महात्मा फुले यांच्या काळात समाजपरिवर्तनासाठी शिक्षणाचे महत्व जाणणरे तेच एक महत्वाचे कृतीशील विचारतंत होते म्हणून त्यांनी आपल्या कार्याचा प्रारंभ शैक्षणिक कार्याने केला.[१०] जोतिरावांच्या सार्वजनिक कार्याची सुरुवातच मुळी शिक्षण प्रसारापासून झालेली आहे. विद्यादेवीचे ते आजन्म उपासक होते. शिक्षणप्रसार हा जोतिरावांच्या चळवळीचा आरंभ होता. त्यांच्या कार्याची इमारत त्यांना शिक्षणाच्या पायावर उभी करावयाची होती, आपल्या आयुष्याचे अर्ध्यापेक्षा अधिक दिवस त्यांनी शिक्षण कार्यासाठी घालविले होते. शिक्षणाशिवाय सुधारणा नाही म्हणून शिक्षण प्रसार करणे हा त्यांच्या चळवळीचा पवित्रा होता.[११]

**स्त्री शिक्षणाचे आद्यजनक :**

भारतीय स्त्रीशिक्षणाचे आद्य प्रवर्तक व शिल्पकार म्हणून जोतीराव गोविंदराव फुले यांना संबोधले जाते. स्त्रियांनी शिकावे ही कल्पनाच समाजात मान्यताप्राप्त न झाल्यामुळे जोतीराव फुले यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. आर्थिक अडचण तर होतीच कारण सरकारी अनुदानाची पध्दतीच अस्तित्वात नव्हती, पण त्याहीपेक्षा महत्वाची अडचण म्हणजे अशा शाळेत मुली शिकल्यासाठी कशा येणार, कोठून येणार, कोणत्या जातीतुन येणार व त्यांना शिकविणार कोण, या सर्व प्रश्नांची यशस्वी सोडवणूक जोतीराव फुले यांनी केली. जोतीराव फुले यांनी स्वत:च्या पत्नीच्या ठिकाणी शिकण्याची आवड प्रथम निर्माण केली. तिला स्वत: शिकविले व नंतर याच शाळेत तिची शिक्षिका म्हणून नेमणुक करण्यात आली.[१२] जोतीरावांनी समाजक्रांतीचे पहिले शस्त्र म्हणून स्त्री शिक्षण घेतले कारण त्याकाळी स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे भ्रष्टाचार करण्यासारखे होते, सनातन्यांच्या सडलेल्या मतांवर तीव्र आघात करुन महाराष्ट्रात प्रथम स्त्रीस शाळेचा दरवाजा उघडुन दिला, तो जोतीरावांनीच, कारण त्यांना माहीत होते की, स्त्री शिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलाचे शिक्षण होय. आपण जर एखाद्या पुरुषाला शिक्षण दिले तर ते एका व्यक्तीला दिल्यासारखे आहे, परंतू एखाद्या स्त्रीला शिक्षण दिले तर ते सर्व कुटुंबाला दिल्यासारखे आहे. हे ओळखुन जोतीरावांनी स्त्री स्वातंत्र्यासाठी व स्त्री शिक्षणासाठी प्रथम टाहो फोडला.[१३] बाया माणसांनी अक्षरे वाचली की, त्या अक्षरांच्या आळ्या बनुनय घरातल्या बायामाणसांच्या ताटात येतात, अशी स्त्री शिक्षणाबद्दल अंधश्रध्दा होती.[१४] अशा स्थितीत स्त्री शिक्षणास प्रारंभ झाला. स्त्रीयांसाठी शिक्षणाची दारं उघडण्याचे मोलाचे कार्य फुले दांपत्यांनी केले.

**शिक्षणाच्या झिरपण्याच्या सिध्दांताला विरोध :**

समाजातील वरिष्ठ वर्गातील लोकांना शुद्रांची सावली देखील त्यांच्या आसपास पडल्यास विटाळ होत अशा स्थितीत वरिष्ठ वर्गाने आत्मसात केलेले ज्ञान कनिष्ठ वर्गापर्यंत पोहोचणे अगदिच अशक्य आहे असे फुलेंचे स्पष्ट मत होते.

वरच्या वर्गातून खालच्या वर्गात, स्वाभाविकपणे शिक्षण झिरपत जाते, ही फिल्टर डाऊन थेअरी फुल्यांनी झिडकारली, भारतातील जातीयवादी भिंतीतुन हजारो वर्षापासुन हे साध्य झाले नाही, आता हे कसे शक्य आहे, हे त्यांना ज्ञात असल्याने ते झिरप सिध्दांताच्या विरोधात होते.[१५]

वरिष्ठ वर्ग कनिष्ठांच्या शिक्षणाबद्दल केवळ उदासीनच नाही तर त्याला त्याबद्दल घृणा वाटते. छडीच्या स्पर्शाने विटाळ होईल म्हणून वर्गातल्या एकटंदुकटं अस्पृश्य विद्यार्थ्यांना मातीची ढेकळं फेकुन मारणारे ब्राम्हण पंतोजी येथे त्याकाळी अपवादात्मक नसुन बहुसंख्य होते. अस्पृश्याच्या मुलाला शाळेत प्रवेश दिल्याबद्दल संतप्त होऊन शाळा सोडण्याची धमकी शिक्षकांना देणारी विषमतेच्या विषावर पोसलेली ब्राम्हण बालके इथे होती.[१६] अशा स्थितीत झिरपण्याचा सिध्दांत उपयोगी नाही हे फुलेंनी झिरपण्याच्या सिध्दांताला विरोध दर्शवत, शिक्षण हे समान व सक्तीचे असावे असे परखड मत मांडले.

**सारांश :**

वर्णभेदामध्ये अडकलेल्या समाजात सामाजिक परवर्तन घडवून आणण्यासाठी विविध समाज सुधारकांची नावे डोळ्यासमोर येतात. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्व स्तरांवर अनेक समाजसुधारक होवून गेले मात्र शैक्षणिक सुधारणेचा विषय येताच महात्मा फुले व सावित्रिबाई फुले या दांपत्याचे नाव न आले तर नवल.

महाराष्ट्रात शुद्रातिशुद्र व स्त्रीयांना शिक्षणाचा हक्क मिळवून देण्याचे महत्वाचे कार्य जोतीराव फुलेंनी केले, या कार्यात त्यांच्या पावालावर पाऊल टाकत सावित्रिबाई फुलेंना साक्ष दिली.

समाजातील शुद्रातिशुद्रांना वरिष्ठ वर्गाच्या सततच्या जाचातुन मुक्त करुन त्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारायची असेल तर त्यांना अज्ञानाचा अंधारातुन बाहेर काढुन ज्ञानमय प्रकाशात नेण्याची गरज फुलेनी ओळखली व समाजपरिर्वनाच्या कार्याची सुरुवात शुद्रातिशुद्र व स्त्रियांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देऊन सुशिक्षित करुन केली. यातुनच सुशिक्षित झालेल्या शुद्रातिशुद्रांना सत्य-असत्य, चांगले-वाईट कळु लागले. पिढ्यानपिढ्या ब्राम्हण वर्गाने धर्माच्या नावाखाली आपली कशी पिळवणुक केली याची जाणीव या ब्राम्हणेतर वर्गातिल सुशिक्षितांना होऊन त्यांनी फुल्यांच्या सत्यशोधक समाजाची तत्वे स्वीकारण्यास प्रारंभ केला आणि पुरोहितशाहिचा विरोध करण्याचे सामर्थ्य या वर्गात निर्माण झाले ते शिक्षणामुळेच.

फुलेंनी कायमच शिक्षण सक्तीचे व सार्वत्रिक असावे असे मत मांडले. शिक्षणाच्या झिरप सिध्दांताला विरोध करुन शुद्रातिशुद्रांना किमान १२ वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे असे मत मांडले.

एकोणिसाव्या शतकात फुलेंनी शुद्रातिशुद्र व स्त्रीयांना शिक्षणाचे क्षेत्र खुले केल्यामुळे समाजाला एक नवी दिशा मिळाली. हळूहळू अज्ञानाचा अंधार दुर होऊन ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र पसरला. अशा प्रकारे महाराष्ट्रातील शुद्रातिशुद्र आणि स्त्रीयांना शिक्षण देण्याचे कार्य महात्मा फुलेंनी आजन्म केल्याचे दिसुन येते.

**संदर्भसूची**

१. उगले जी. ए., ज्ञानोदय आणि महात्मा फुले, कॅन्डीड प्रकाशन, वर्धा,मार्च २००४, पृ.५.
२. पेंडके प्रतिभा सुधीर, जागतिक शिक्षणतज्ञ, विद्या प्रकाशन, नागपूर, जानेवारी २०१०, पृ.२०.
३. देशपांडे के. ना. व माळी आ. ल., भारतीय शिक्षणतज्ञ आणि विचारवंत, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१४, पृ.३२.
४. नरके हरि, आम्ही पाहिलेले फुले, महात्मा फूले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, ६ जून १९९३, पृ.१४५.
५. तांबोळी शमसुद्दीन व तांबोळी बेनझीर, प्रभावशाली शिक्षणतज्ञ-जागतिक-भारतीय-महाराष्ट्रीय,डायमंड पब्लिकेशन, पुणे, २३ मे २००९, पृ.३.

६. फडके य.दि., महात्मा फुले समग्र वाड्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १४ एप्रील १९९१, पृ.९.
७. पवार ना.ग. / वरोकर अविनाश, भारतीय समाजाक्रांतीचे जनक महात्मा जोतीराव फूले, पद्मगंधा प्रकाशन - पुणे, जुलै २००४, पृ.८७.
८. भोळे भास्कर लक्ष्मण, महात्मा जोतीराव फुले वारसा आणि वसा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००१, पृ.१३४.
९. खोब्रागडे हर्षानंद / गारोडे प्रमोद, महात्मा फुल्यांचे विचार - सुदर्भ तृतीयरत्न, सत्सार व अखंडादिकाव्य, देवयानी प्रकाशन - मुंबई, ऑक्टोबर २००८, पृ.४९.
१०. गुंदेकर श्रीराम, महात्मा फुले : विचार आणि वाड्मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९२, पु.३६.
११. पाटील पं. सि., महात्मा जोतिराव फुले यांचा अल्प परिचय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८४, पृ.५०.
१२. पवार ना.ग. / वरोकर अविनाश, उपरोक्त, पृ.९२,९३.
१३. देशपांडे के. ना. व माळी आ. ल., उपरोक्त, पृ.३३.
१४. चंद्रासे - जोशी ललिता, महिला शिक्षणतज्ञ, संकेत प्रकाशन, नांदेड, १९ ऑगस्ट २००८, पृ.९.
१५. उगले जी. ए., महात्मा फुले - एक मुक्त चिंतन, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००१, पृ.२४.
१६. भोळे भास्कर लक्ष्मण,उपरोक्त, पृ.११६.